# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३

## (सकाळी १०.३० ते ११.४५ वाजता)

**म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) – [अनुक्रमांक (१) व (२)] – (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

(१) **सर्वश्री अंबादास दानवे**, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, विलास पोतनीस, जयंत पाटील, किरण सरनाईक, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स.** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"राज्यात माहे नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पडलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे २२ जिल्ह्यातील सुमारे साडेचार लाख हेक्टरपेक्षा जास्त पिकांचे झालेले नुकसान, सद्यःस्थितीत पंचनामे काम संथगतीने सुरु असल्याने नुकसानीचा आकडा वाढण्याची शक्यता असणे, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामात काढून ठेवण्यात आलेल्या पिकांचेही नुकसान झाले असल्याने पंचनामा करताना उक्त नुकसानीचा समावेश करण्याची आवश्यकता असणे, अवकाळी पावसामुळे १० जणांचा मृत्यू झाला असून शेकडो पशुधनही शेतकऱ्यांनी गमावले असणे, पावसामुळे ऊसाची तोड थांबल्याने गळीत हंगामावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता असणे, मिचौंग चक्रीवादळामुळे राज्यातील पर्यावरणीय वातावरणात प्रचंड बदल झाला असून पाऊस व वातावरणातील बदलामुळे पुन्हा राज्यातील उरलेली पिके नुकसानीच्या उंबरठ्यावर आली असणे, अवकाळी पावसामुळे नुकसान न झालेल्या पिकांवर पांढरी बुरशी, करपा व अन्य बुरशीजन्य रोगाची तसेच कीड रोगाची लागण होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, अवकाळी पाऊस व मिचौंग चक्रीवादळामुळे राज्यातील संपूर्ण मच्छिमारी ७ ते १० दिवस बंद राहिल्यामुळे मच्छिमारांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले असणे, तथापि, शासनाने अद्याप या नुकसानीचे पंचनामे केले नसणे, राज्यात झालेली अतिवृष्टी, त्यानंतर पडलेल्या

दुष्काळाची मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, पीक विमा कंपन्यांच्या मुजोरपणामुळे शेतकरी पीक विम्यापासूनही वंचित राहिले असणे, एकाच वर्षात अतिवृष्टी, दुष्काळ व अवकाळीमुळे राज्यातील शेतकरी पूर्णत: उध्वस्त झाला असल्यामुळे पीक कर्ज फेडण्यासही असमर्थ असणे, राज्यसरकारने शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, तसेच सोयाबीन, कापूस व संत्री उत्पादन खर्च प्रचंड वाढले असून बाजारात मिळणारा भाव अत्यल्प असणे, त्यातच येलो मोझँक, बोंडअळी व पेरणी केल्यानंतर पाऊस न पडल्याने सोयाबीन-कापसाचे झालेले प्रचंड नुकसान, त्यामुळे उत्पादनात झालेली प्रचंड घट, काढणी खर्चही परवडत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी उभ्या पिकात शेळ्या-मेंढ्या सोडल्या असणे, सोयाबीन, कापूस व संत्रा उत्पादक शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा असणे, तसेच पोखरा योजनेतून शेडनेट उभारण्यासाठी बँक व कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना मदत दिली जात असणे, तथापि, वादळी वाऱ्यात सदरहू शेडनेट वाहून गेल्यावर नुकसान भरपाई मिळण्यासाठी कोणताही विमा नसणे, त्याचप्रकारे पशुधन नुकसानग्रस्तांना विमा नसणे, याबाबत शासनाकडून आश्वासनांचा पाऊस पाडणे, परंतू त्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली शासनाप्रती असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री प्रविण दरेकर,** रामराजे नाईक-निंबाळकर, डॉ.मनिषा कायंदे, प्रा.राम शिंदे, सर्वश्री विक्रम काळे, किशोर दराडे, सुरेश धस, सतिश चव्हाण, विजय उर्फ भाई गिरकर, अब्दुल्लाहखान दुर्राणी, प्रसाद लाड, अनिकेत तटकरे, चंद्रशेखर बावनकुळे, अमोल मिटकरी, प्रविण पोटे-पाटील, निरंजन डावखरे, निलय नाईक, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, रमेश कराड, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, वसंत खंडेलवाल, श्रीकांत भारतीय, उमा खापरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, महादेव जानकर, **वि.प.स.** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"राज्यात ज्या शेतकऱ्यांनी सन २०१९ नंतर शेतीचे नवीन खाते उघडले आहे त्या शेतकऱ्यांना पीएम किसान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना या योजनांचा लाभ मिळत नसणे, राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पेरण्यांची चिंता सतावत असताना काढणी झालेल्या खरीपांच्या पिकांना

अग्रिम प्रत

योग्य भाव मिळेल की नाही अशी चिंता शेतकऱ्यांना भेडसावत असणे, राज्यात कापूस, सोयाबीन, तूर, धान, कांदा, केळी, संत्रा या पिकांचे नासाडी झाली असणे, सोयाबीनचे दर हमी भावापेक्षा खाली गेल्याचे निदर्शनास येणे, कमी व अवकाळी पावसामुळे दाटलेली दुष्काळी छाया आणि किडरोगाच्या प्रकोपामुळे कापूस व सोयाबीनच्या उत्पादनात खुपच घट झाली असणे, केंद्र सरकारने कांद्याची किमान निर्यातमूल्य (एमईपी) थेट ८०० डॉलर प्रतिटन करण्याचा निर्णय घेतल्याने कांदा निर्यातीला खिळ बसल्याचे निदर्शनास येणे, राज्य शासनाने शेतकऱ्यांना २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत केली असणे, एनडीआरएफ निकषाप्रमाणे केंद्र सरकारने ४० तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले असून उर्वरित सर्व तालुक्यांची जबाबदारी राज्य शासनाने घेतली असणे, जे नुकसान झाले आहे त्यासह शेतकऱ्यांच्या यापुर्वीच्या देखील सर्व नुकसानीची भरपाई देण्यास सरकार कटीबध्द असणे, पैनगंगा ते वैनगंगा जोडणी प्रकल्पास मान्यता देण्यात येणे, शासनाने केंद्राच्या निकषात न बसणाऱ्या १२०० मंडळांना दुष्काळसदृश जाहिर केले असणे, तसेच २० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात २५ टक्के अग्रीम राशी जमा केली असणे, शेतकऱ्यांना विविध प्रकारचे लाभ डीबीटीच्या माध्यमातून देण्यात येणे, राज्यात हळद उत्पादनात वाढ होत असल्याने हळद निर्यातीला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, आदर्श गाव योजनेत निवड झालेल्या गावांना दिल्या जाणाऱ्या निधीत हेक्टरी १० हजार रुपयांची वाढ झाली असणे, लोकसहभाग आणि जलसंधारणाच्या कामातून राज्यात व देशात ओळख निर्माण करणाऱ्या आदर्श गाव राळेगणसिध्दी व हिवरे बाजार या गावांच्या धर्तीवर राज्यातील अन्य गावांचा विकास व्हावा याकरिता शासनाने आदर्श गाव योजना प्रकल्प व संकल्प समिती गठीत केली असणे, दुष्काळी भागातील गावे, गावकऱ्यांचा एकोपा व लोकसहभाग अधिक असलेल्या गावात जलसंधारण ग्रामविकासाची कामे करताना सप्तसुत्रीनुसार अंमलबजावणी करण्याचे शासनाचे धोरण असणे, रब्बी हंगामासंबंधी फळ पिक विमा योजनेत सहभागाबाबत कार्यवाही सुरु असणे, केळी पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेतून शेतकरी विमा संरक्षण देण्यात येणे, पिक विमा योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांकडून सातबारा उताऱ्यावर २०२३-२४ संबंधी केळी पिकांची नोंद नसल्यास स्वयंघोषणापत्रावर केळी लागवड केली आहे अशी घोषणा केल्यास त्याला पिक विमा योजनेत सहभागी करून घ्यावे म्हणून शासनाकडून बँकांना निदेश दिले असणे, विदर्भातील कृषी क्षेत्राचा फायदा व्हावा याकरिता कृषी महाविद्यालयाच्या जागेवर शासनाकडून कृषी तज्ञ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या

अस्वाक्षरित प्रत

नावाने आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्याचा शासनाचा मानस असणे, राज्यातील शेतकरी केंद्रबिंदू मानून अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची व राज्य सुजलाम सुफलाम करण्याची शासनाची भूमिका, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **संसदीय कार्य मंत्री** : "विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक १७ जुलै, २०२३ ते दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण २९७ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १०६ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह" सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **कृषी मंत्री** : **(क)** "डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा चौपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ व सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) व (२)] —**

**(१)** **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाच्या गृह विभागात सध्या ५२,८२२ पोलीस शिपाई पदे रिक्त असणे, त्यामुळे पोलीस शिपाई भरती तातडीने करावी अशी अनेक उमेदवारांची मागणी असणे, पोलीस भरतीसाठी हे उमेदवार मोठ्या प्रमाणात सराव करीत असणे, कोरोना काळात अनेक उमेदवारांची वयोमर्यादा संपत असल्याने उमेदवार निराश झालेले असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये सामान्य प्रशासन विभागामार्फत २ वर्ष कमाल वयोमर्यादा वाढवून देण्यात येणे, त्यानुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पूर्वी पोलीस भरती जाहिरात काढून पदे भरून घेतल्यास लाखो उमेदवार पोलीस भरतीस पात्र होणार असणे, त्यामुळे शासनाने तातडीने पोलीस भरतीचा निर्णय घ्यावा अशी मागणी होत असतानाही त्यावरील कार्यवाहीस होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील पोलीस भरतीस इच्छुक उमेदवारांमध्ये पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२)** **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बलात्काराचा गुन्हा दाखल करून व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी देत दिंडोरी (जि.नाशिक) येथील श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक पिठाच्या विश्वस्त यांच्याकडून खंडणी मागणाऱ्या कृषी सहाय्यक महिलेस १० लाख रुपये घेताना दिनांक १९ नोव्हेंबर, २०२३ रोजी पोलिसांनी केलेली अटक, संबंधित महिला पिंप्री (ता.निफाड) येथे तालुका बीजगुणन केंद्रात कृषी सहाय्यक पदी कार्यरत असणे, सदरहू महिलेने सुमारे एक कोटीपेक्षा जास्त रक्कम उकळल्याचे भयानक वास्तव समोर येणे, पोलिसांनी घेतलेल्या सदरहू महिलेच्या घराच्या झडतीत तब्बल १९ लाख रुपये वसूल करणे, संबंधित

महिलेस पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची सुनावण्यात आलेली पोलिस कोठडी, तरी देखील संबंधित महिलेचे अद्याप शासनाने न केलेले निलंबन, परिणामी खंडणी वसूली संदर्भात शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)** — **[अनुक्रमांक (३) ते (७)]** —

(३) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गत काही वर्षांत बेस्टच्या परिवहन सेवेला तोटा झालेला असणे, तसेच अनेक आंदोलनांनी घेरलेले असणे, बेस्टच्या ताफ्यात प्रवाशांच्या सोयीसाठी दाखल झालेल्या वातानुकूलित सिंगल/ डबल डेकर बस, त्यामुळे बेस्टची प्रवासी संख्या वाढून उत्पन्न मिळण्याऐवजी तोटा वाढलेला असणे, खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने बेस्ट उपक्रमाने भाडेतत्वावरील बसगाड्या आणून स्वमालकीपेक्षा भाड्याच्या गाड्यांची संख्या वाढवण्यावर दिलेला भर, सहा बस पुरवठादारांकडून कंत्राटी पद्धतीवर चालक, वाहक आणि यांत्रिकी कर्मचाऱ्यांचे घेतलेले मनुष्यबळ, विविध प्रयोग करूनही बेस्टचे उत्पन्न वाढून तोटा कमी करण्यात आलेले अपयश, सन २०१९ मध्ये बेस्ट उपक्रम, मुंबई महानगरपालिका आणि कामगार संघटनांमध्ये बेस्टला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी झालेला सामंजस्य करार, बेस्टला सन २०१९ ते २०२३ या काळात मुंबई महानगरपालिकेने प्रदान केलेली ६०३३ कोटी ८५ लाख रुपयांची रक्कम, तरीही बेस्टची फारशी समाधानकारक न झालेली प्रगती, त्यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित राहिलेल्या बेस्ट कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या, बेस्टच्या ताफ्यात सद्य:स्थितीत स्वमालकीच्या असलेल्या केवळ १६८६ बस, सन २०२५ नंतर त्यांचे आयुर्मान संपणार असल्याने ताफ्यात एकही बस शिल्लक न राहण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे कर्मचारी आणि प्रवाशांमध्ये शासनाबद्दल पसरलेली नाराजीची भावना, यास्तव बेस्टच्या मालकीचा ३३३७ बसचा ताफा कायम ठेवण्यासह बेस्ट कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री प्रवीण दटके,** चंद्रशेखर बावनकुळे, निलय नाईक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

अग्रिम प्रत

"नागपूर शहरात असणाऱ्या महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास आणि नझूल जमिनीवर सुमारे ४२४ अतिक्रमित झोपडपट्टी अस्तित्वात असणे, शहरातील साधारणतः ८ लाख जनसंख्या यामुळे प्रभावित असणे, सन २००२ साली शहरातील झोपडपट्टी आणि अतिक्रमण निर्मुलनाच्या अनुषंगाने गरजू नागरिकांना पट्टे वाटप करण्याचा शासन निर्णय झाला असणे, सन २००७ साली शहरातील कामगार कॉलनी, तुकडोजी नगर येथून पट्टे वाटप प्रक्रियेची सुरुवात करताना आलेल्या अडचणीच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्थेच्या मार्फत पट्टे वाटप करण्याऐवजी वैयक्तिक पातळीवर करण्याबाबत बदल सुचविण्यात आले असणे, सन २०१६ च्या नागपूर सुधार प्रन्यासच्या परिपत्रकानुसार अधिकृत झोपडपट्टीवर पट्टे नियमानुकूल करण्यास सुरुवात झाली असणे, आजतागायत १० हजार पट्टे वाटप प्रक्रिया पूर्ण झाली असणे, परंतु खाजगी मालमत्ता आणि झुडपी जंगले व्याख्येत येणाऱ्या जागेवर पट्टे वाटप करण्यास शासन स्तरावर अडचणी येत असणे, झुडपी पट्ट्यांचा संदर्भ वन विभाग, केंद्र शासनाशी येत असल्याने शासनाने केंद्र शासनाशी पत्रव्यवहार आणि बैठकीतून सदर प्रश्नी सकारात्मकरित्या धोरण आखण्याची असणारी गरज, खाजगी मालमत्तेवरील आणि झुडपी पट्टे वाटप धोरण प्रभावीपणे राबवणेकामी जनतेचे प्रश्न आणि लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री अभिजित वंजारी,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विदर्भ वैधानिक विकास महामंडळ व इतर वैधानिक विकास महामंडळ यांची मुदत सन २०१९ मध्ये संपुष्टात आली असून ५ वर्ष उलटून गेल्यावरही या वैधानिक विकास महामंडळांना मुदतवाढ देण्यासंदर्भात शासनाने कोणताही निर्णय घेतला नसणे, दांडेकर समितीच्या अहवालाच्या निष्कर्षानुसार पश्चिम महाराष्ट्राच्या निमिर्तीपासून विदर्भातील सिंचनाचा व सर्व क्षेत्रातील विकासाचा अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टिकोनातून या महामंडळाची निर्मिती करण्यात येणे, परंतु आता गेल्या ५ वर्षापासून या महामंडळाची मुदतवाढ संपल्यापासून विदर्भाचा अनुशेष भरून काढण्याकरिता कोणताही निर्णय घेतला नसणे, सन २०२२ च्या नागपूर येथील अधिवेशनात विदर्भासंबंधित अनेक घोषणा करण्यात येणे, परंतु अनुशेष भरून काढण्याकरिता अतिरिक्त निधीची

मान्यता देण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसणे, या वैधानिक महामंडळाच्या मुदतवाढीकरिता केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा करून ६ महिन्याच्या आत वैधानिक विकास महामंडळे पूर्ववत सुरू करण्याचे आश्वासन देवूनही प्रत्यक्षात कोणतीच कार्यवाही न होणे, त्यामुळे विदर्भाचा सर्व क्षेत्रातील अनुशेष वाढत असल्याने पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६)** **डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अंबरनाथ (पश्चिम) मौजे जांभीवली तालुका अंबरनाथ येथील सर्वे नं. ३/१अ, ब, क, ड (४० एकर) १७/ १ अ ब (१८ एकर) अशी एकूण ५८ एकर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादन केलेली असणे, सदर जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी जमीन मालकांनी महामंडळाकडे अर्ज करणे, नमूद जमीन विशेष भूसंपादन अधिकारी, उल्हास खोरे प्रकल्प, ठाणे यांनी सन १९७४ साली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादीत केलेली असणे, संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला आजतागायत देण्यात आलेला नसणे, मोबदला मिळावा याकरिता भूसंपादन कायदा सन २०१३ नुसार जमीन मालकांनी शासनाच्या संबंधित विभागाकडे अर्ज करणे, जमिनीच्या मोबादल्याकरिता प्रादेशिक अधिकारी २, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ठाणे व उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी मिळकतीबाबतचा निवाडा, कब्जे पावती, संयुक्त मोजणी पत्रक यांचा अहवाल देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करणे, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(७)** **श्री.विक्रम काळे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शाळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास शासनाने मनाई आदेश लागू करण्यात येणे, तथापि मुंबईतील अनेक शाळांजवळ, शहरांच्या अनेक भागात राजरोसपणे तंबाखूजन्य पदार्थ व बंदी असलेला गुटखा देखील विकला जात असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, वास्तविक शासनाच्या एकूण १२ यंत्रणांना तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्री विरोधात कारवाई करण्याचे अधिकार

अग्रिम प्रत

असणे, मात्र बहुतांश सर्वच यंत्रणांकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील पायोनियर पब्लिक स्कूल, क्रांतीनगर, आकुर्ली तसेच चांदिवली येथील संघर्ष नगर वसाहतीतील पालिका शाळेसमोर व अन्य शाळांच्या परिसरात आणि घाटकोपर परिसरात सुगंधी सुपारीच्या नावाखाली पदार्थांची सर्रास विक्री होत असल्याचे निदर्शनास येत असणे, परंतु अन्न व औषध प्रशासन विभागाने गेल्या वर्षभरात या पदार्थांची विक्री करणाऱ्या टपऱ्यांविरोधात एकही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शाळांमधील विद्यार्थी नकळत व्यसनाकडे ओढला जाणे, परिणामी विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षण संस्थांचे मुख्याध्यापक, शाळा कृती समितीचे पदाधिकारी यांचेमध्ये पसरलेला असंतोष, अलिकडेच अशाच प्रकरणातून अहमदनगर येथील सारडा विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचेवर टपरीवाल्याकडून जीवघेणा हल्ला झाल्याची घटना लक्षात घेता संबंधित १२ यंत्रणांकडून कारवाई करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सहा : सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा – (दुसरा व शेवटचा दिवस)**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

१) मुख्यमंत्री
२) उप मुख्यमंत्री (गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा, राजशिष्टाचार)
३) उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन)
४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री
५) सहकार मंत्री
६) महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री
७) वने, सांस्कृतिक कार्य, मस्त्यव्यवसाय मंत्री
८) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री
९) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री

अग्रिम प्रत

१०) आदिवासी विकास मंत्री

११) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री

१२) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

१३) सार्वजनिक बांधकाम (सार्व.उपक्रम) मंत्री

१४) मृद व जलसंधारण मंत्री

१५) कृषी मंत्री

१६) कामगार मंत्री

१७) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री

१८) उद्योग मंत्री

१९) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

२०) सार्वजनिक बांधकाम (सार्व.उपक्रम वगळून) मंत्री

२१) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री

२२) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री

२३) अन्न व औषध प्रशासन मंत्री

२४) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री

२५) राज्य उत्पादन शुल्क मंत्री

२६) महिला व बालविकास मंत्री

२७) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री

२८) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री

२९) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री

**सात : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३"

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

अग्रिम प्रत

(१) **सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३**
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(२) **सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२३**
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**आठ** : **श्री.प्रविण दरेकर**, श्रीमती मनिषा कायंदे, सर्वश्री विक्रम काळे, सुरेश धस, प्रसाद लाड, विप्लव बाजोरिया, सतिश चव्हाण, रणजितसिंह मोहिते-पाटील, किशोर दराडे, अमोल मिटकरी, चंद्रशेखर बावनकुळे, किरण सरनाईक, अनिकेत तटकरे, निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दटके, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यात मागील तीन महिने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा मुद्दा आंदोलने, मोर्चे, अन्न सत्याग्रह इत्यादी माध्यमातून ऐरणीवर आला असणे, काही समाजकंटकांकडून आरक्षण मिळण्याकरिता जाळपोळ, दंगल इत्यादी माध्यमांचा वापर झाल्याचे निदर्शनास येणे, त्यापैकी काही गट मराठा समाजाला ओबीसीत समावेश न करता स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी करित असणे, तर काही गट मराठा समाजाला

अग्रिम प्रत

कुणबी ओबीसींचे दाखले द्यावेत म्हणून आग्रही असणे, यासोबतच राज्यातील ओबीसी जनमोर्चा, धनगर, व्हीजेएनटी, एसबीसी, बंजारा, मुस्लिम इत्यादी समाजही आरक्षणाच्या मागणीसाठी पुढे आल्याची बाब निदर्शनास येणे, कोळी व महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीत आरक्षणाचा लाभ मिळण्याबाबत व तसे दाखले देण्याबाबत होत असलेली मागणी, महायुती शासनाच्या काळात मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण परत मिळावे ही मराठा समाजाची अपेक्षा असणे, यासाठी क्युरेटिव्ह याचिकाही दाखल करण्यात आली असणे, न्यायमूर्ती भोसले समितीने सुचविलेल्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या असणे, मराठा आरक्षण प्रश्नी सरकारला मार्गदर्शन करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या तीन निवृत्त न्यायमूर्तींची समिती निवृत्त न्यायमूर्ती श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनाने गठीत केली असणे, इतर मागास समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची शासनाची भूमिका असणे, केंद्र शासनाच्या विश्वकर्मा योजनेची सांगड घालत राज्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी करुन बारा बलुतेदारांना लाभ मिळवून देण्याचे शासनाचे धोरण असणे, राज्यातील बारा जातींचा ओबीसी म्हणून महाराष्ट्राच्या सूचीत समावेश आहे, त्याच धर्तीवर केंद्राच्या सुचीत समावेश करण्यासाठी तसा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्राकडे पाठविण्यात आला असणे, मराठा समाजाचा इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे काम युध्द पातळीवर सुरु असणे, निजामकालीन कुणबी समाजाच्या नोंदी तपासण्याचे काम युध्दपातळीवर सुरु असणे, सारथी, बार्टी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ व महाज्योतीप्रमाणे इतर मागासवर्गाच्या ओबीसी महामंडळाला समान निधी देण्याचे आदेश अर्थ मंत्रालयाकडून काढण्यात येणे, बंजारा तांडे रस्त्यांना जोडण्यासाठी संत सेवालाल महाराज जोड रस्ते योजना, धनगर वस्त्या रस्त्यांना जोडण्यासाठी यशवंतराव होळकर जोड रस्ते योजना व इतर मागासवर्ग विमुक्त जाती 'अ' भटक्या जमाती 'ब', 'ड' व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना राज्य शासनाकडून लागू करण्यात आली असणे, आरक्षण आंदोलनाकडे राजकीयदृष्ट्या न बघता सर्वच राजकीय पक्षांनी चर्चा विमर्षाच्या माध्यमातून आरक्षण प्रश्नी तोडगा काढण्याची आवश्यकता, अन्य आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीतले आरक्षण देण्यासाठी शासन कटिबध्द असणे, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

अग्रिम प्रत

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **श्री.अंबादास दानवे,** ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, **वि.प.स.**

"**मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत नसल्याबाबत**" या विषयावरील **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २०५८५ ला दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री.रमेश पाटील,** श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, **वि.प.स.**

"**नवी मुंबई-सायन-पनवेल मार्गावरील वाशी गाव येथे बस थांब्याचे शेड नसल्याबाबत**" या विषयावरील **सर्वश्री रमेश पाटील, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.** यांचा दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ६ मधील अता. प्र.क्र. १७४२७ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ११ डिसेंबर, २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत